MHSO100019522022

**वि.दि.दा.क्र.३७७/२०२२ मधील नि.क्र.२९ खालील आदेश.**

वादीने सदरचा अर्ज मयत प्रतिवादी महादेव एकनाथ गायकवाड याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्याने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी  हा ता.१३.०९.२०२३ रोजी मयत झाला आहे. प्रतिवादी हा मयत झाल्यानंतर त्याच्या वारसांची माहिती वादी कंपनीचे कर्मचारी घेत होते परंतु त्यांना माहिती मिळाली नाही. प्रतिवादीचे नावे असलेल्या माढा तालुक्यातील मिळकतीला सुध्दा वारस नोंदी अद्याप करुन घेतलेल्या नाही. त्यामुळे प्रतिवादीचे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाही. त्यामुळे प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास १ वर्ष, ४ महिने विलंब झाला आहे. सदरचा विलंब वादीकडून जाणीवपुर्वक झालेला नाही. त्यामुळे सदरचा विलंब माफ करणे आवश्यक आहे. म्हणून त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादीतर्फे जबाब न दिल्यामुळे त्याच्या जबाबाशिवाय सदरच्या अर्जाचे कामकाज चालविण्यात येत आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी वादीतर्फे विद्वान वकील श्री.देव यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी हा ता.१३.०९.२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. त्यानंतर ता.०४.०१.२०२५ रोजी वादीने सदरचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब का झाला, याबाबतचे संयुक्तिक स्पष्टीकरण वादीतर्फे देण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

### मुद्दा क्र.२ बाबतः–

५. मी वर नमूद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**वि.दि.दा.क्र.३७७/२०२२**

**मधील नि.क्र.२९ खालील आदेश.**

## आदेश

सदरचा नि.क्र.२९ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.04.28 15:44:58 +0530

ता.२८.०४.२०२६.

(सोपान द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

४ **<u>वि.दि.दा.क्र.३७७/२०२२</u>**

**<u>मधील नि.क्र.२९ खालील आदेश</u>.**

शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री. म. पां. सदाफुले.

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.२८.०४.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.२८.०४.२०२६.

आदेश स्वाक्षरित केल्याचा दि.२८.०४.२०२६.

आदेश अपलोड केल्याचा दि.२८.०४.२०२६.

स्वाक्षरित/–

(श्री. म. पां. सदाफुले )

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.